महाराष्ट्र शासन
नगरपरिषद प्रशासन संचालनालय

दूरध्वनी क्र.०२२-२४९२७६३१.
इ-मेल- dma7scheme2@gmail.com
संकेतस्थळhttps://mahadma.maharashtra.gov.in

सातवा मजला, बेलापुर भवन,सेक्टर-11, सी.बी.डी. बेलापुर, नवी मुंबई – 400614,कार्यासन क्र.०७.

क्र.नपप्रसं/ योजना परिपत्रक / २०२६/का.७/२२४५१८९/255

दिनांक:- 13 MAY 2026

विषय:-नगरविकास विभागाकडून निर्गमित करण्यात येणाऱ्या काही शासन निर्णयात कार्यान्वयीन यंत्रणा सार्वजनिक बांधकाम विभाग (PWD) अथवा इतर कोणतीही कार्यान्वयीन यंत्रणा असलेल्या शासन निर्णयाच्या निधी वितरणाबाबत.

संदर्भ:-१)मा.सह आयुक्त यांचे परी क्र.नपप्रसं/ योजना परिपत्रक/२०२६/का.७/२२४५१८९/दिनांक:- ८.०५.२०२६.

# -:सुधारित परिपत्रक:-

नगर विकास विभागामार्फत विविध योजनांचा निधी वितरीत करण्यासाठी शासन निर्णय निर्गमित करण्यात येतात. सदर शासन निर्णयांन्वये नगरपरिषद प्रशासन संचालनालयाकडून निधी संबधित जिल्हा सह आयुक्त यांना वितरीत केला जातो. काही शासन निर्णयामध्ये कार्यान्वयीन यंत्रणा ही सार्वजनिक बांधकाम विभाग (PWD)अथवा इतरही दुसऱ्या कार्यान्वयीन यंत्रणा असतात. काही शासन निर्णयामध्ये कार्यान्वयीन यंत्रणा ही सार्वजनिक बांधकाम विभाग (PWD) असलेल्या शासन निर्णयाच्या निधी वितरणासंबधी संदर्भ क्र.१ अन्वये परिपत्रक निर्गमित करण्यात आले होते.सदर परिपत्रकाच्या अनुषंगाने सुधारित परिपत्रक खालील प्रमाणे

नगर विकास विभागामार्फत विविध योजनांअंतर्गत निर्गमित करण्यात येणाऱ्या काही शासन निर्णयांमध्ये सार्वजनिक बांधकाम विभाग (PWD) तसेच इतर कार्यान्वयी यंत्रणांचा समावेश करण्यात येतो. सदर शासन निर्णयांनुसार निधी वितरणाची कार्यवाही जिल्हा नियोजन अधिकारी व जिल्हा सह आयुक्त कार्यालयामार्फत करण्यात येत असल्याने निधी वितरण, उपयोगिता प्रमाणपत्र प्राप्ती, प्रगती आढावा व वित्तीय नियंत्रण यामध्ये सुसूत्रता व एकरूपता असणे आवश्यक आहे.

त्याअनुषंगाने, पुढीलप्रमाणे सूचना देण्यात येत आहेत :-

1. नगरपरिषद प्रशासन संचालनालयामार्फत वितरीत करण्यात येणाऱ्या विविध योजनांचा निधी हा (ज्या शासन निर्णयामध्ये कार्यान्वयीन यंत्रणा सार्वजनिक बांधकाम विभाग (PWD) आहे) अथवा इतर दुसऱ्या कोणत्याही कार्यान्वययीन यंत्रणा आहे अशा शासन निर्णयाचा निधी जिल्हा नियोजन अधिकारी व जिल्हा सह आयुक्त यांनी संबधित कार्यान्वयीन यंत्रणेला वितरीत करावा.
2. नगर विकास विभागाकडून निर्गमित शासन निर्णयातील अटी व शर्तीच्या अधीन राहूनच निधी वितरणाची कार्यवाही करण्यात यावी.

3. निधी वितरणापूर्वी संबंधित कार्यान्वयी यंत्रणेकडून प्रशासकीय मान्यता, तांत्रिक मान्यता, अंदाजपत्रक व आवश्यक कागदपत्रांची पडताळणी करण्यात यावी.
4. संबंधित कार्यान्वयीन यंत्रणेकडून उपयोगिता प्रमाणपत्र (UC), खर्च विवरणपत्र व प्रगती अहवाल वेळोवेळी प्राप्त करून त्याची माहिती नगरपरिषद प्रशासन संचालनालयास सादर करण्यात यावी.
5. उपयोगिता प्रमाणपत्र प्राप्त न झाल्यास अथवा निधीच्या वापराबाबत समाधानकारक माहिती उपलब्ध न झाल्यास त्याची सर्वस्वी जबाबदारी संबधित जिल्हा नियोजन अधिकारी व जिल्हा सह आयुक्त यांची राहील.
6. नगरपरिषद प्रशासन संचालनालयामार्फत तयार करण्यात आलेल्या UDMA MAHAPAY प्रणालीवर सर्व व्यवहारांची नोंद घेण्यात यावी.
7. वितरित निधी, खर्च, शिल्लक रक्कम, प्राप्त उपयोगिता प्रमाणपत्रे व प्रगती अहवाल यांची स्वतंत्र नोंद ठेवण्यात यावी.

मा. आयुक्त तथा संचालक, नपप्रसं यांच्या मान्यतेने.

(संजय काकडे)
सह आयुक्त
नगरपरिषद प्रशासन संचालनालय,मुंबई